**दिन विशेष...**

१६०० : ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली.

१९५१ : दैनिक ज्ञानप्रकाश हा बंद पडला.

१९२६ : प्राचीन इतिहासाचे गाढे अभ्यासक वि.का.राजवाडे यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,६७५.०८ -२०.४६ (०.०२४%)
डॉलर ₹ ८९.८७

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १० |
| दिल्ली | २१ | ०८ |
| मुंबई | २८ | १९ |
| नागपूर | २८ | १२ |
| पुणे | २९ | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ५२ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

आपण बघीतलेले स्वप्न, ध्येय गाठण्यासाठी ठरवलेला प्रत्येक पाऊल पुढे नेतो.

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०४ | संध्या-५:५७ |

**सोने – चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,३८,०४५/- | २,४०,०००/- |

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# भाजपा-शिंदेसेनेची १४ महापालिकांत तुटली युती

## ठाकरे गटातील इनकमिंग वाढले; राष्ट्रवादीत राजीनाम्यांचे सत्र

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील एकूण १४ महापालिकांमध्ये भाजपा आणि शिंदे गटातील युती तुटली असून दोन्ही पक्षांनी स्वबळावर निवडणुका लढवण्याची घोषणा केली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटातील इनकमिंग वाढले असून मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी अनेकांची पक्षप्रवेशासाठी लगबग दिसून आली शिंदे गटाचे टेंभीनाका येथील शाखाप्रमुख निखील बुडजडे यांनी अपक्ष अर्ज दाखल करण्याची भूमिका घेतल्याने बंडखोरी झाल्याची चर्चा सुरू झाली नवी मुंबईत भाजपातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून आमदार मंदा म्हात्रे यांनी गणेश नाईक यांच्यावर टीकेची तोफ डागली पत्नीला भाजपाकडून उमेदवारी मिळताच शरद पवार यांच्या पक्षाचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या सर्व पदांचा राजीनामा दिला.**



आगामी महापालिका निवडणुकीसाठी भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाने काही दिवसांपूर्वी युतीची घोषणा केली होती. मुंबईसह राज्यातील अनेक महापालिकांमध्ये दोन्ही पक्ष एकत्र लढणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले होते. परंतु जागावाटपावरून वाढलेला तणाव आणि पक्षातील संभाव्य बंडखोरी लक्षात घेता भाजपा व शिंदे गटाने एकूण १४ महापालिकांच्या निवडणुकीत स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पुण्यासह पिंपरी चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, (पान २ वर)


### ● शिवसेना ठाकरे गटातील इनकमिंग वाढले

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटातील इनकमिंग वाढले आहे. गेल्या आठवडाभरात उद्धव ठाकरे यांच्या मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी अनेकांची पक्षप्रवेशासाठी लगबग दिसून आली आहे. मुंबईतील बोरीवली पूर्वेच्या प्रभाग क्रमांक १३ मधील भाजपाच्या माजी नगरसेविका आसावरी पाटील यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह मंगळवारी ठाकरे गटात प्रवेश केला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला आहे. यावेळी ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई, शिवसेना उपनेत्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, विभागप्रमुख उदेश पाटेकर, विभागसंघटक शुभदा शिंदे तसेच इतर पदाधिकारी आणि शिवसैनिकांची उपस्थिती होती.**

# धुळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर

## जळगावला महायुतीची सत्ता : आ. अनिल पाटील

प्रतिनिधी । धुळे



महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात युती झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस ४५ जागा लढवणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.

उर्वरित जागांवर शिवसेना (शिंदे गट) निवडणूक लढवणार असून, दोन्ही पक्षांमध्ये चर्चेअंती जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याचेही ते म्हणाले. धुळे महापालिका निवडणुकीसाठी महायुतीत भाजपसोबत युती करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आग्रही होती. मात्र भाजपकडून अपेक्षित (पान २ वर)

**थोडक्यात**

### मुंबईसाठी आपचा जाहीरनामा प्रसिद्ध

**मुंबई ।** आम आदमी पार्टीने (आप) मंगळवारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये केजरीवाल की गॅरंटी या नावाने मोफत आणि २४ तास पाणीपुरवठा, २०० युनिटपर्यंत मोफत वीज, मोफत जागतिक दर्जाचे शिक्षण आणि आरोग्यसेवा देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वातील आपने २२७ सदस्य असलेल्या मुंबईसाठी ७५ उमेदवार उभे केले आहेत.



### महागाईमुळे इराणमधील जनता उतरली रस्त्यावर

**तेहरान ।** इराणमधील महागाईने उच्चांक गाठल्यामुळे हवालदिल झालेल्या जनतेने रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले आहे. देशाच्या महत्वाच्या शहरांमध्ये लोकांनी रस्त्यावर उतरून सरकारविरोधी घोषणाबाजी आणि उग्र निदर्शने करायला सुरुवात केल्याचे आज बघायला मिळाले. मध्य इराणमधील इस्फाहन, दक्षिणेकडील शिराझ आणि इशान्य इराणमधील मशहादसह राजधानी तेहरानच्या काही भागांमध्ये ही उग्र निदर्शने झाली. संतप्त जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. दरम्यान गृहमंत्र्यांनी जनतेच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्यात, अशी सूचना इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कीयान यांनी केली आहे.

# भारत बनला जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक स्तरावर एक मोठी ऐतिहासिक झेप घेतली असून जपानला मागे टाकत भारत आता जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे.**



२९ डिसेंबर २०२५ रोजी केंद्र सरकारने जारी केलेल्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, भारताच्या जीडीपीचा आकार आता ४.१८ ट्रिलियन डॉलर्स (सुमारे ३५० लाख कोटी रुपये) इतका झाला आहे. सध्याच्या वेगवान विकासदरामुळे भारत लवकरच जर्मनीलाही मागे टाकेल आणि २०३० पर्यंत ७.३ ट्रिलियन डॉलर्स (सुमारे ६१० लाख कोटी रुपये) जीडीपीसह जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. सध्या अमेरिका आणि चीन हे देश अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी आहेत.


भारताच्या या नेत्रदीपक वाढीमागे देशांतर्गत भक्कम मागणी आणि (पान २ वर)

# सप्तश्रृंगीदेवीचे मंदिर आजपासून २४ तास खुले

## ट्रस्टचा मोठा निर्णय

वृत्तसंस्था । कळवण

नाताळ सुट्ट्यांचा कालावधी, शाकंबरी नवरात्रोत्सव, नववर्षाचे स्वागत यामुळे संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने सप्तशृंगगडावरील भगवतीचे मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आजपासून (दि. ३०) ४ जानेवारीपर्यंत हा निर्णय लागू असेल. २४ तास आदिमायेचे दर्शन मिळणार असल्याने भाविकांना सुलभतेने दर्शनाचा लाभ घेणे शक्य होणार आहे.



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र सप्तशृंग गड येथील श्री भगवती सप्तशृंगी माता मंदिर येथे सालाबादप्रमाणे नाताळ उत्सव संदर्भीय सुट्ट्यांचा कालावधी, शाकंबरी नवरात्रोत्सव, नववर्षाचे स्वागताला (पान २ वर)

# जळगावमध्ये अजित पवार गट भाजपला विकला गेला

## महानगराध्यक्ष अभिषेक पाटलांचा राजीनाम्यानंतर खळबळजणक आरोप

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेच्या निवडणुकीदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू मानले जाणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे जळगाव महानगराध्यक्ष अभिषेक पाटील यांनी मंगळवारी तडकाफडकी राजीनामा दिल्याने चांगलीच खळबळ उडाली. दरम्यान, पाटील यांनी आपल्या राजीनाम्याचे कारण देताना पक्ष नेतृत्वावर बरेच खळबळजनक आरोप केले आहेत.**



गेल्या काही दिवसांपासून जळगाव महानगरपालिकेसाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढण्यासाठी जोरदार हालचाली सुरू होत्या. मात्र, जागा वाटपावरून सुरू असलेली चर्चा बरेच दिवस अंतिम टप्प्यावर पोहोचू शकली नाही. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसला अपेक्षित जागा मिळत नसल्याने पक्षांतर्गत नाराजी वाढत असल्याचे चित्र होते. मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असतानाच शहरातील हॉटेल रॉयल पॅलेसमध्ये एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला भाजपचे निवडणूक प्रमुख सुरेश भोळे, अजित पवार गटाचे नेते माजी मंत्री गुलाबराव देवकर, महानगराध्यक्ष अभिषेक पाटील तसेच राष्ट्रवादीचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, या बैठकीत जागा वाटपाबाबत कोणताही सकारात्मक निष्कर्ष न निघाल्याने राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली. (पान २ वर)

**➤ महानगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर अभिषेक पाटील यांनी अजित पवार गटाचे नेते आमदार अनिल पाटील, माजी मंत्री गुलाबराव देवकर आणि जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. पक्षाची निवडणूक लढवायची ताकद असतानाही तिघांनी भाजपशी केवळ सहा जागांवर परस्पर सोयीस्कर तडजोड केली. त्यातही चार उमेदवार मूळ पक्षाचे नाहीत, त्यांना भाजपमधून ऐनवेळी आयात केले आहे. उर्वरित दोन जागांपैकी एका जागेवर माजी मंत्र्यांचा मुलगा उभा राहणार आहे. जळगावमधील राष्ट्रवादी अजित पवार गट तिघांनी भाजपला विकून टाकला आहे, अशी टीका अभिषेक पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना केली.**

### टी-२० वर्ल्ड कपसाठी इंग्लंड संघाची घोषणा

वृत्तसंस्था । लंडन

पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये टी-२० विश्वचषकाचे आयोजन होणार आहे. यंदा या प्रतिष्ठेच्या आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भारत आणि श्रीलंका यांच्याकडे आहे. टीम इंडियाचा संघ आधीच जाहीर झाला असून, आता एकामागोमाग एक इतर संघांच्याही घोषणा होत आहेत. इंग्लंड अँड वेल्स क्रिकेट बोर्डने देखील आपल्या संघाची अधिकृत घोषणा केली जाहीर करण्यात आलेल्या संघात हॅरी ब्रुक (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, ब्रायडेन कार्स, सॅम करन, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, जेमी ओव्हरटन, आदिल रशीद, फिल साल्ट, जोश टोंगे आणि ल्यूक वूड यांचा समावेश आहे.

# नाशिकमध्ये एबी फॉर्मसाठी नेत्यांच्या गाड्यांचा पाठलाग

## गिरीश महाजन म्हणाले, हे अतिशय चुकीचं



वृत्तसंस्था । नाशिक

**राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महापालिकांच्या निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक उमेदवारांची धावपळ सुरू आहे, तर अनेक ठिकाणी इच्छुक उमेदवारांना पक्षाने तिकीट नाकारल्याने पदाधिकाऱ्यांकडून संताप व्यक्त केला जात आहे.**

यावरूनच नाशिकमध्ये मोठ्या घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं आहे. इच्छुक उमेदवारांना पक्षाचा एबी फॉर्म न मिळाल्याने अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच काही भाजपाच्या इच्छुक उमेदवारांनी आणि कार्यकर्त्यांनी एबी फॉर्म मिळण्यासाठी पक्षाच्या नेत्यांच्या गाड्यांचा पाठलाग केल्याचा प्रकार नाशिकमध्ये घडला आहे. या प्रकारामुळे नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळाचं वातावरण निर्माण झाल्याचं चित्र दिसून आलं.

दरम्यान, या सर्व घडामोडींवर आता भाजपाचे नेते (पान २ वर)

### ➤ जे झालं ते अतिशय चुकीचचं : मंत्री गिरीश महाजन

'जे झालं ते अतिशय चुकीचं आहे. कारण या ठिकाणी जागा फक्त १२२ आहेत आणि आमच्याकडे उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या एक हजारांच्या आसपास होती. त्यातच आज एबी फॉर्म देण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आज उमेदवारांना एबी फॉर्म देण्याचं काम सुरू होतं. मात्र, अनेकांना वाटलं की आपल्यालाच तिकीट मिळालं पाहिजे आणि त्यांनी मोठ्या प्रमाणात गोंधळ घातला. आता सर्वांनाच वाटतं की आपल्यालाच उमेदवारी मिळाली पाहिजे. पण जागा कमी आहेत आणि इच्छुकांची संख्या जास्त असल्याने असा गोंधळ झाला', असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे.

# भुसावळातील झोनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमधील ८० वर प्रशिक्षणार्थींना विषबाधा

## खाजगीसह रेल्वे रुग्णालयात उपचार : जेवणाच्या दर्जावरच प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी । भुसावळ

शहरातील झोनल रेल्वे ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमधील विविध विभागात प्रशिक्षण घेणाऱ्या सुमारे ८० वर प्रशिक्षणार्थींना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याचा धक्कादायक व तितकाच संतापजनक प्रकार घडल्याने रेल्वे वर्तुळात खळबळ उडाली आहे. उपचारार्थ प्रशिक्षणार्थींवर रेल्वेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. झेडआरटीआयचे प्राचार्य रामनिवास मीना यांच्या माहितीनुसार, ४० रुग्णांवर रेल्वे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या सर्व प्रकाराची आता चौकशी केली जाणार आहे. (पान २ वर)

### ➤ काय घडले भुसावळात ?

भुसावळ शहरातील रेल्वे ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये लोकोपायलट, असिस्टंट लोको पायलट, स्टेशन मास्टर, गार्ड आणि तिकीट तपासणी कर्मचारी अशा विविध पदांचे प्रशिक्षण सुरू आहे. मंगळवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास अचानक अनेक प्रशिक्षणार्थींना उलट्या आणि मळमळ, हगवणुकीचा त्रास सुरू झाला. अवघ्या काही वेळातच बाधितांचा आकडा ८० पर्यंत पोहोचल्याने प्रशिक्षण केंद्रात भीतीचे वातावरण पसरले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रेल्वे प्रशासनाने तातडीने रुग्णवाहिका पाचारण केल्या आणि सर्व बाधितांना रेल्वे रुग्णालयात हलवले.



# अविष्कारमधूनच तरूणांच्या विचारांना चालना मिळेल!

## गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.प्रशांत बोकारे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**संशोधनासारख्या स्पर्धेत तरूणाईच्या भविष्याचा प्रतिबिंब दिसत असून अविष्कार मधूनच तरूणांच्या विचारांना निश्चितपणे चालना मिळेल, असा आशावाद गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला.**




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित विद्यापीठस्तरीय अविष्कार -२०२५ या स्पर्धेचे उद्घाटन मंगळवार, दि.३० रोजी पार पडले. या प्रसंगी ते बोलत होते. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.विलास सपकाळ, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जयदीप साळी, अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, अधिसभा सदस्य डॉ.विशाल पराते, वैशाली वराडे, डॉ.एस.आर. पाटील, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, सीए रवींद्र पाटील, अविष्कारचे सचिव डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, समन्वयक नवीन दंदी, सह समन्वयक डॉ.अमरदीप पाटील उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.बोकारे म्हणाले की, आपल्या देशातील समस्या किंवा आपल्याला निर्माण झालेल्या समस्या सोडवायच्या असतील तर तरूणांनी उत्तम संशोधन करणे आवश्यक आहे. संशोधनामधूनच समस्यांचे निराकरण करता येणे शक्य आहे. विकसीत देशाची धुरा युवकांच्या खांद्यावर असून आजची तरूणपिढी ही कृत्रीम बुध्दीमत्तेच्या (एआय) पुढचाही विचार करायला लागली आहे. देशात संपन्नता यायची असेल किंवा समृध्दी टिकून राहायची असेल तर भारतीय बनावटी वस्तूंचा वापर अधिकाधिक करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांना चांगली प्रगती करून मोठे व्हायचे असेल तर कॉपी पेस्ट न करता मुळ संकल्पनेचा विचार करणे आवश्यक असल्याचेही डॉ.बोकारे यावेळी म्हणाले.

यावेळी कुलगुरू प्रा.विलास सपकाळ, कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक समन्वयक डॉ.नविन दंदी यांनी तर सूत्रसंचलन डॉ.प्रिती सोनी व डॉ.विजय घोरपडे यांनी केले. आभार अविष्कारचे सचिव डॉ.जयेंद्र लेकुरवाळे यांनी मानले.

### ➤ नवसंशोधकांचा अविष्कार

**विद्यापीठातील पदवी प्रदान सभागृहात सुरू असलेल्या अविष्कार स्पर्धेत जळगाव, धूळे, नंदूरबार आणि विद्यापीठ प्रशाळेतील पहिल्या टप्प्यात पात्र ठरलेल्या ५२८ संशोधक विद्यार्थ्यांच्या ३३८ प्रवेशिकांची नोंदणी झाली असून यामध्ये ३०४ पोस्टर आणि ३४ मॉडेल्सचे सादरीकरण करण्यात आले.**

### ➤ आज समारोप

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या दुसऱ्या टप्प्यातील अविष्कार स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ बुधवार, दि.३१ रोजी दुपारी ३.४५ वाजता होणार आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.व्ही. एल. माहेश्वरी, माजी प्राचार्य अनिल राव, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत.

# तक्रार निवारण सभा घेण्यास शिक्षण अधिकाऱ्यांची मान्यता

## ● माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । जळगाव



जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत समन्वय समितीने सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी तक्रार निवारण सभा घेण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती समन्वयक तुळशीराम सोनवणे यांनी दिली आहे.

ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न, प्रकरणे प्रलंबित आहेत, अशा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या समस्या सुवाच्य अक्षरात दोन प्रतींमध्ये लिहून समक्ष किंवा पोस्टाने तातडीने प्र.ह. दलाल, कन्हैयालाल प्लॉट, जामनेर रोड, भुसावळ या पत्त्यावर पाठवाव्यात तसेच सभेला जास्तीत जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वय समिती अध्यक्ष गिरीश नेमाडे, पी.ए. पाटील, सुनिता खडके, सुनीता पाटील, गोविंदा पाटील, एस.एस.अहिरे, अश्विनी पाटील आदींनी केले आहे.

**● जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, सेवाजेष्ठता, पदोन्नती, मान्यता, थकबाकी तसेच विविध प्रशासकीय स्वरूपाची अनेक प्रकरणे जिल्हा शिक्षण अधिकारी कार्यालयात प्रलंबित आहेत. या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन संबंधितांना न्याय मिळावा, यासाठी तक्रार निवारण सभा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या सभेमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास समन्वय समितीने व्यक्त केला आहे.**

# पान १ वरुन

### सप्तश्रृंगीदेवीचे मंदिर नववर्षानिमित्त......

प्रतिवर्षी गर्दी होते. गर्दीचे व्यवस्थापन व भाविकांना समाधानकारक व सुलभतेने दर्शन होण्याच्या दृष्टीने श्री भगवती मंदिर ट्रस्टच्या वतीने मंगळवार, ३० डिसेंबरपासून रविवार, ४ जानेवारीपर्यंत दररोज २४ तास दर्शन रांग सुरू ठेवण्यात येणार आहे. प्रतिवर्षी श्री भगवतीच्या दर्शनाने अनेक भाविक नववर्षाचे स्वागत करतात. त्यामुळे श्री क्षेत्र सप्तशृंगगड येथे नववर्षादरम्यान भाविकांची प्रचंड गर्दी लोटते. गर्दीचे व्यवस्थापन करणे सुलभ व्हावे, भाविकांना विनाविलंब दर्शन मिळावे, गर्दी विभागली जाऊन संभाव्य दुर्घटना टाळता याव्यात या बाबींचा विचार करून मंदिर ट्रस्ट मंदिर पुढील सहा दिवस दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. देवीच्या दर्शनासाठी राज्यभरातून विशेषत: उत्तर महाराष्ट्रातून गडावर दाखल होणाऱ्या भाविकांना या निर्णयाचा मोठा फायदा होणार आहे. भाविकांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त संस्थेने केले आहे. नवीन वर्षाचे स्वागत देवदर्शनाने करण्याचा पायंडा मागील काही वर्षांपासून दृढ झाला आहे. शेकडो भाविक त्र्यंबकेश्वर, शिर्डी, शेगावला रवाना झाले आहेत. तर बाहेरील भाविकांनी वेरूळ येथे घृष्णेश्वराच्या दर्शनासाठी गर्दी केली आहे. मंदिरात पहाटेपासून भाविकांची गर्दी आहे. मंदिर प्रशासनाने मुखदर्शनाचा निर्णय घेतल्यामुळे गर्दी नियंत्रणात आहे. दिवसभरात एक लाखापेक्षा अधिक भाविकांनी दर्शन घेतले आहे.नाताळच्या सुट्टीमुळे वेरूळ-अजिंठा लेणी, देवगिरी किल्ला, बीबी का मकबरा या पर्यटनस्थळी पर्यटकांची गर्दी उसळली आहे. पर्यटनस्थळी रविवारी पर्यटकांची विक्रमी गर्दी झाली होती. ज्योतिर्लिंग घृष्णेश्वराच्या दर्शनासाठी एक लाखापेक्षा अधिक भाविक आले होते.

### भुसावळातील झोनल ट्रेनिंग......

जेवणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह - ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या मेसमध्ये देण्यात आलेल्या अन्नामुळेच ही विषबाधा झाली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मध्यरात्रीच्या वेळी एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचारी आजारी पडल्याने रेल्वेच्या आरोग्य विभागाची मोठी तारांबळ उडाली होती. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.एनआरएमयू संघटना आक्रमक - रेल्वे कर्मचाऱ्यांना विषबाधा झाल्यानंतर एनआरएमयू संघटना शहरात आक्रमक झाली आहे. या प्रकाराविरोधात एनआरएमयू संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे रुग्णालयातील कॅन्टीनजवळ निदर्शनेही केली.

### नाशिकमध्ये एबी फॉर्मसाठी......

गिरीश महाजन यांनी नाराजी व्यक्त करत झालेला प्रकार अतिशय चुकीचा असल्याचं म्हटलं आहे. तसेच या प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही गिरीश महाजन यांनी दिला आहे.

### जळगावमध्ये अजित पवार......

बैठकीनंतर महानगराध्यक्ष अभिषेक पाटील यांनी तर थेट आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावे पाठवलेल्या पत्रात त्यांनी अत्यंत थोडक्यात, 'मी माझा राजीनामा देत आहे,' असे त्यांनी नमूद केले आहे. मात्र, त्यांच्या या एका ओळीच्या पत्रामुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. पक्षांतर्गत मतभेद, स्थानिक नेतृत्वाकडे होत असलेले दुर्लक्ष आणि निर्णय प्रक्रियेत डावलले जात असल्याची भावना यामुळेच अभिषेक पाटील नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे महायुतीत, विशेषतः अजित पवार गटात अस्वस्थता निर्माण झाली असून महानगरपालिका निवडणुकीच्या समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, महापालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेनेच्या शिंदे गटात युती झाली किंवा नाही झाली तरी आपल्या पक्षाला किमान २५ जागांवर उमेदवार द्यायचे आहेत, असे अजित पवार गटाचे नेते आमदार अनिल पाटील यांनी नुकतेच पत्रकारांशी बोलताना म्हटले होते. त्यादृष्टीने महानगराध्यक्ष पाटील आणि इतर पदाधिकारी तयारीला लागले होते. प्रत्यक्षात, भाजप आणि शिंदे गटाशी झालेल्या अंतिम चर्चेनंतर पक्षाचे नेते माजी मंत्री गुलाबराव देवकर यांनी अजित पवार गटाच्या वाट्याला सहा जागा आल्याचे स्पष्ट केले. या सर्व घडामोडींमुळे व्यथित होऊन बैठकीतून बाहेर पडलेले महानगराध्यक्ष अभिषेक पाटील यांनी त्यांचा पदाचा राजीनामा पक्षाध्यक्ष अजितदादांकडे तडकाफडकी पाठवून दिला आहे.

### धुळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा......

प्रतिसाद न मिळाल्याने ही युती प्रत्यक्षात येऊ शकली नाही. भाजपकडे उमेदवारांची मोठी गर्दी असल्याने त्यांनी प्रस्तावाला प्रतिसाद दिला नाही, असा खुलासा अनिल पाटील यांनी केला. दरम्यान, जनतेत असलेल्या रोषामुळे अनेक दिग्गज नेत्यांनी संपर्क साधल्याचेही त्यांनी नमूद केले. महायुतीतील घटक पक्ष म्हणून शिवसेना (शिंदे गट) सोबत सखोल चर्चा करून राष्ट्रवादी काँग्रेसने युतीचा निर्णय घेतला. या युतीमुळे धुळे महापालिकेत शिवसेना सोबत योग्य दिशा ठरल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर बसेल, असा विश्वासही आमदार अनिल पाटील यांनी व्यक्त केला. काही प्रभागांमध्ये कार्यकर्त्यांचा आग्रह असून ४२ ते ४३ जागांची मागणी झाली होती, मात्र अंतिम टप्प्यात २ ते ३ जागांबाबत समजूत काढून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. महायुतीतील कोणत्याही पक्षाला धक्का देण्याचा उद्देश नसून सर्व पक्ष एकत्रितपणे निवडणुकीचा प्रचार करणार आहेत. जळगाव महापालिकेतही भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती झाली असून तेथे महायुतीतील सर्वाधिक जागा निवडून येतील, असा विश्वास अनिल पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. भाजप आणि शिवसेना यांच्यात धुळ्यात समन्वय होऊ न शकल्याने शिवसेनेने राष्ट्रवादीकडे युतीचा प्रस्ताव ठेवला आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस युतीसाठी सोबत राहण्याचा निर्णय घेतल्याचेही अनिल पाटील यांनी स्पष्ट केले. युतीचा निर्णय हा केवळ राजकीय गणितापुरता मर्यादित नसून धुळे शहराच्या विकासासाठी घेण्यात आला आहे. शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि नागरी सुविधा या प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प दोन्ही पक्षांनी केला आहे.

### जपानला मागे टाकत......

विशेषतः खाजगी उपभोगाचा मोठा वाटा असल्याचे सरकारने म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा वास्तविक जीडीपी दर ८.२% वर पोहोचला असून, तो गेल्या सहा तिमाहींमधील उच्चांकी स्तर आहे. जागतिक व्यापारात अनिश्चितता असूनही भारताने आपली लवचिकता सिद्ध केली आहे. महागाईचा दर मर्यादेच्या आत राहणे, बेरोजगारीच्या दरात झालेली घट आणि निर्यातीमधील सुधारणा ही या आर्थिक प्रगतीची महत्त्वाची लक्षणे आहेत. तसेच व्यावसायिक क्षेत्राला होणारा पतपुरवठा आणि शहरी भागातील वाढता उपभोग यामुळे आर्थिक स्थिती अधिक मजबूत झाली आहे.

### भाजपा-शिंदेसेनेची १४......

जालना या महानगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपा व शिंदे गट आमने-सामने येणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास अवघे अडीच तास शिल्लक असताना ही युती तुटल्यामुळे दोन्ही पक्षातील नेत्यांची मोठी धावपळ उडाली. यादरम्यान १४ ठिकाणी युती तुटली असली तरीही मुंबईसह उपनगरातील महापालिकांमध्ये दोन्ही पक्ष एकत्रित निवडणूक लढवणार आहे. भाजपातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर - नवी मुंबईत भाजपातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून आमदार मंदा म्हात्रे यांनी गणेश नाईक यांच्यावर टीकेची तोफ डागली आहे. नवी मुंबई महानगर पालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. यादरम्यान आमदार मंदा म्हात्रे यांनी मागितलेल्या तेरा जणांना उमेदवारी देण्यात आली. मात्र त्यांना वेळेवर एबी फॉर्म न भेटल्याने म्हात्रे यांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवली आहे. काल संध्याकाळी मी पाच ते आठ पर्यंत वाट पाहिली माझे फोन संजीव नाईक यांनी उचलले नाहीत. नंतर जिल्हाध्यक्ष डॉ राजेश पाटील यांनी नंतर १३ फॉर्म दिले मात्र त्यावर सही देण्यात आली नाही फॉर्म भरा, सकाळी सही करतो असे पाटील यांनी सांगितले. आज सकाळी सहा पासून संपर्क करण्याचा प्रयत्न केले मात्र फोन उचलला नाही, असे म्हात्रे यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी गणेश नाईक यांच्यावरही टीका केली आहे.

# नववर्षानिमित्त मुक्ती फाउंडेशनतर्फे आरोग्य शिबीर

प्रतिनिधी । जळगाव

**येथील सामाजिक सेवाभावी संस्था मुक्ती फाउंडेशनतर्फे नववर्षानिमित्त बुधवार दि.३१ रोजी विविध उपक्रमांसह आरोग्य शिबिराचे आयोजन पांजरापोळ गोशाळा परिसरात करण्यात आले आहे.**

या उपक्रमांतर्गत आजपासून दारू, गुटखा, तंबाखू, सुपारीजन्य पदार्थ नको, व्यसनमुक्त, व्याधिमुक्त राहू आनंदी जीवन जगू, दारू नको दूध घेऊ, गंभीर पीडितांसाठी रक्तदान करू आदी विषयांवर जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी साबुदाणा फलाहार सेवा करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त गरजूंनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अरुश्री परिवार, मुक्ती फाउंडेशनचे मुकुंद गोसावी, गोपाल वालेचा, एस.पी.गणेशकर, डॉ.मेहुल पटेल, सीए. हितेश आगीवाल, वैभव निकुंभ यांनी केले आहे.

# मनसेकडून उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणूकीच्या मैदानात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने देखील उडी घेतली असून सोमवारी (दि.२९) मनसेचे नेते माजी आ.अॅड. जयप्रकाश बाविस्कर यांच्याहस्ते उमेदवारांना एबी फॉर्म वाटप करण्यात आले.**



फॉर्म वाटप करतेवेळी जिल्हाध्यक्ष अॅड.जमील देशपांडे, शहराध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळेले, शहर उपाध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, विभाग अध्यक्ष उमेश आठरे, सुरेश राठोड, राहुल चव्हाण, खुशाल ठाकूर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मनसेकडून उपमहानगराध्यक्ष राजेंद्र निकम, ललित शर्मा, प्रकाश जोशी, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील हे निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. दरम्यान दोन महिलांना सुद्धा पक्षाने उमेदवारी दिली आहे. यावेळी बोलतांना माजी आ.अॅड.जयप्रकाश बाविस्कर यांनी, आमची पहिली यादी आम्ही प्रकाशित केलेली आहे. उर्वरित यादी आम्ही सकाळी प्रसारित करू, असे सांगितले.

# उपराष्ट्रपती ४ जानेवारी रोजी जिल्ह्यात

प्रतिनिधी । जळगाव



भारताचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांचा रविवार, दि.४ जानेवारी २०२६ रोजी जळगाव जिल्ह्याचा प्रस्तावित दौरा आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली विविध यंत्रणांची पूर्वतयारी संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, उपवनसंरक्षक राम धोत्रे, अपर जिल्हाधिकारी डॉ.श्रीमंत हारकर, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी घुगे यांनी सांगितले की, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांचे दि.४ रोजी सकाळी ६ वाजता रेल्वेमार्गे जळगाव रेल्वे स्थानकावर आगमन होणार असून त्यानंतर अजिंठा शासकीय विश्रामगृहाकडे प्रयान होणार आहे. तेथून सकाळी ८ वाजता ते अजिंठा छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करणार आहेत. या प्रस्तावित दौऱ्यासाठी सर्व विभागांनी आपापली जबाबदारी समन्वयाने व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडावी, असे निर्देश त्यांनी दिले. दौऱ्याच्या पूर्वतयारीसंदर्भात पोलीस विभागाने रेल्वे स्थानक परिसर तसेच शहरात पुरेसा बंदोबस्त ठेवून वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करावे. जळगाव महानगरपालिकेने रेल्वे स्थानकाबाहेरील परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता, अतिक्रमण हटविणे आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

# पत्रकार दिनानिमित्त ६ रोजी व्याख्यान, आरोग्य तपासणी शिबीर

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हा पत्रकार संघात मंगळवार, दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त पत्रकार बांधवांसाठी व्याख्यानासह आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

जळगाव जिल्हा पत्रकार संघातर्फे दरवर्षी पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदा देखील मंगळवार, दि.६ रोजी पत्रकार दिन साजरा करण्यात येणार असून दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम सकाळी १०.३० वाजता सर्वसाधारण सभा होईल. त्यानंतर ११ वाजेपासून पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाला सुरुवात होईल. पत्रकार संघाचे विश्वस्त विजय बापू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वक्ते संदीप घोरपडे यांचे 'आजची पत्रकारिता' याविषयावर व्याख्यान होणार आहे. त्यानंतर आर.एल. हॉस्पिटल यांच्या सहकार्याने पत्रकारांसाठी मोफत आरोग्य तपासणी होणार आहे तर इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या सौजन्याने रक्तदान शिबीर पार पडणार आहे. आरोग्य तपासणीसाठी नाव, संपर्क नंबर नोंदणी आवश्यक असून पत्रकार संघात दररोज ११ ते ३ या वेळेत नोंदणी करता येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पत्रकार संघाचे पदाधिकारी व आरोग्य समिती अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी केले आहे.

# संविधान सदनात रायसोनी महाविद्यालयाच्या अक्षया दानीने केले महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व

प्रतिनिधी । जळगाव




देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आणि पंडित मदन मोहन मालवीय यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, दि.२५ रोजी नवी दिल्ली येथील संसद भवनातील संविधान सदनात संसद सचिवालय, लोकसभा अध्यक्ष कार्यालय आणि भारत सरकारच्या संयुक्त सहभागातून एका भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाची विद्यार्थिनी अक्षया दानी हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

या विशेष कार्यक्रमात देशभरातून 'माय भारत' या पोर्टलअंतर्गत निवड करण्यात आलेल्या ३६ तरुणांनी सहभाग नोंदवून आपल्या विचारांचे प्रभावी मांडणी केली. या राष्ट्रीय स्तरावरील मंचावर जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाची विद्यार्थिनी अक्षया दानी हिने संसदेत पंडित मदन मोहन मालवीय यांच्या जीवनकार्य व राष्ट्रउभारणीतील योगदानावर तीन मिनिटांचे सर्वोत्कृष्ट आणि प्रभावी भाषण सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विशेष बाब म्हणजे, विविध टप्प्यांतील कठीण निवड प्रक्रियेतून संपूर्ण महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी अक्षया दानीला प्राप्त झाली होती, ही बाब रायसोनी महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे. दिल्लीहून परतल्यानंतर अक्षया दानी हिचे जी.एच. रायसोनी महाविद्यालयात जंगी स्वागत करण्यात आले.

### ■ संविधान भवनापर्यंत महाविद्यालयाचे नाव पोहोचले

यावेळी आयोजित कौतुक समारंभात महाविद्यालयाच्या संचालिका प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, 'अक्षया हिच्या या राष्ट्रीय पातळीवरील निवडीमुळे जी.एच. रायसोनी महाविद्यालयाचे नाव थेट संविधान भवनापर्यंत पोहोचले आहे. अक्षयाचा आत्मविश्वास, विचार मांडणीची क्षमता आणि नेतृत्वगुण खरोखरच वाखाणण्याजोगे आहेत. टोस्टमास्टर्स क्लब व राष्ट्रीय सेवा योजना यांसारख्या उपक्रमांमध्ये अक्षयाचा सक्रिय सहभाग असल्याने तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठा फायदा झाला आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी संस्थेचे चेअरमन सुनील रायसोनी यांनी देखील मनोगत व्यक्त केले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# भाजपा ६३ जागांवर स्वबळावर लढणार

## ३१ पुरूष तर ३२ महिला उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप






प्रतिनिधी । धुळे

**भारतीय जनता पक्षाने धुळे महापालिकेच्या ७४ पैकी ६३ जागा स्व:बळावर लढविण्याचा निर्णय केला असून काल रात्रीपासूनच निश्चित उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप केले जात आहे. ३१ पुरूष तर ३२ महिला उमेदवार निश्चित करून त्यांना भारतीय जनता पक्षाचे एबी फॉर्म देण्यात येत असल्याची माहिती भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी दिली आहे.**

धुळे महापालिका निवडणूकीसाठी सर्वात जास्त ५५० इच्छुक उमेदवार भाजपाकडे होते. त्यामुळे उमेदवारीसाठी प्रचंड रस्सीखेच भारतीय जनता पक्षामध्ये सुरू होती. पक्षाकडून उमेदवार निश्चित करून घोषणा करण्यात कमालिची गुप्तता पाळण्यात आली. अखेरच्या क्षणापर्यंत भाजपाची उमेदवारी कोणाला हे अनेक प्रभागांमध्ये स्पष्ट झालेले नाही. मात्र संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी आणि आपल्या उमेदवारांसमोर विरोधीकांनी प्रबळ उमेदवार देवू नये म्हणून भाजपाकडून सुरू असलेल्या या खेळीचा हवा तसा परिणाम दिसतो काय हे अर्ज छाननी प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार असून प्रमुख लढतींचे चित्र माघारीनंतर स्पष्ट होणार आहे.

### आर.ओ. ऑफीसवर भाजप-शिवसेनेचे एबी फॉर्म पोहोचले

मनपा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी आणि अखेरच्या क्षणाला भारतीय जनता पक्षाकडून ६३ उमेदवार निश्चित करीत त्यांचे एबी फॉर्म आर.ओ. ऑफिस अर्थात अर्ज स्विकृतीसाठी नेमलेल्या ६ केंद्रांवर पाठविण्यात आले. अधिकार्यांना हे फॉर्म भाजपच्या कार्यकर्त्यांनी सोपविले. भाजप प्रमाणेच शिवसेना शिंदे गटातर्फे देखील आपल्या उमेदवारांचे एबी फॉर्म निवडणुक निर्णय अधिकार्यांच्या हाती अखेरच्या क्षणी देण्यात आले आहे.

### ६३ जागांवर उमेदवारी निश्चित

दरम्यान भारतीय जनता पक्षाच्या कोअर कमिटीने धुळे महापालिकेच्या ७४ पैकी ६३ जागा स्व:बळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. या ६३ जागांवरील उमेदवार देखील निश्चित करण्यात आले आहे. ६३ पैकी ३१ पुरूष उमेदवार तर ३२ महिला उमेदवार भाजपाकडून निवडणूक रिंगणात उतरवण्यात येत असल्याची माहिती महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी दैनिक श्रमराज्यशी बोलतांना दिली आहे.

## थोडक्यात

### धुळ्यातील चित्रकार सादर करणार कलाकृती

**धुळे ।** कलातपस्वी जागतिक कीर्तीचे कलावंत केकी मुस यांच्या ३५ व्या पुण्यतिथीनिमित्त चाळीसगाव येथील केकी मुस प्रतिष्ठानच्या आवारात दि.३१ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान सामूहिक कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात धुळे येथील एस.एस.व्ही.पी.एस. स्कूल ऑफ आर्ट्सचे प्रा.अविनाश सोनवणे, महाराणा प्रताप हायस्कूलचे कलाशिक्षक रवी राजपूत, फाईन आर्ट स्टुडिओचे संचालक छोटू पवार यांच्या कलाकृती मांडण्यात येणार आहेत. कलाकृती या जलरंग माध्यमात सादर करण्यात येणार असून निसर्गचित्रणाचा त्यामध्ये समावेश आहे. चाळीसगावच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांच्याहस्ते या कलाप्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.

### सोयाबीन खरेदी नोंदणीसाठी मुदतवाढ

**धुळे ।** खरीप हंगाम २०२५-२०२६ साठी नाफेडच्यावतीने सोयाबीन खरेदीला सुरुवात करण्यात आली आहे. दरम्यान, राज्य शासनाकडून नोंदणीसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी आर.एस. इंगळे यांनी दिली. नोंदणीसाठी धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रिया सोसायटी लि. धुळे, शिरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री सोसायटी लि. शिरपूर, शिंदखेडा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. दोंडाईचा, शेतकरी सहकारी संघ लि. साक्री, इंडीया ग्रो फार्मर्स को-ऑप सोसायटी लि. शिंगावे, शेतकरी सहकारी संघ लि. नंदुरबार, शहादा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. शहादा यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची उसळली गर्दी




प्रतिनिधी । धुळे

**महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी निवडणूक कार्यालय परिसरात प्रचंड गर्दी केली होती. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, बसपा, एमआयएमचे पदाधिकारी तसेच अपक्ष उमेदवारांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केले. काही उमेदवारांनी वाजत-गाजत रॅली काढून शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केले.**

प्रभाग क्र.१५ मधून काँग्रेसच्या साजिदा बी. अजिज खा पठाण, प्रभाग क्र.१७-अ मधून गौरव चंद्रकांत उगले, प्रभाग क्र.१७-ब मधून सुरेखा चंद्रकांत उगले, प्रभाग क्र.१७ अ व ड मधून शिवसेनेचे विनोद जगताप, प्रभाग क्र.१६-ड मधून अपक्ष उमेदवार जितेंद्र जगताप, प्रभाग क्र. १९-ब मधून एमआयएमतर्फे अमिर असलम पठाण, प्रभाग क्र.९ मधून बसपातर्फे अनिता सिद्धार्थ पाटील, प्रभाग क्र. ७-अ मधून अपक्ष उमेदवार प्रभावती रामधार परदेशी, प्रभाग क्र.९ मधून पूनम विजय भामरे, प्रभाग क्र.११ मधून अपक्ष उमेदवार कैलास मराठे तर प्रभाग क्र. २ मधून अपक्ष उमेदवार ॲड.अमित दुसाने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

दरम्यान, काही उमेदवारांचे कागदपत्र अपुर्ण राहिल्याने त्यांचा अज दाखल होवू शकला नाही.

### धुळे जिल्हा क्रिकेट संघात तिघांची निवड

प्रतिनिधी । बोराडी





धुळे जिल्हा क्रिकेट असो. तर्फे १९ वर्षाआतील मुलींच्या जिल्हा क्रिकेट संघासाठी नुकतीच निवड चाचणी घेण्यात आली. यात शिरपूर येथील कर्मवीर व्यंकटराव तानाजी रणधीर सीबीएसई स्कूलच्या तीन खेळाडूंची अंतिम १५ खेळाडूंमध्ये निवड करण्यात आली आहे.

यात फिरकी गोलंदाज अवंतिका राकेश बोरसे, प्रथम फलंदाज व जलद गोलंदाज सोनाक्षी सुनील पटेल व फलंदाज व यष्टीरक्षक अश्विनी कृष्णा पावरा या खेळाडूंचा समावेश आहे. स्पर्धेतील सर्व सामने हे पुणे येथे होणार असून त्यासाठी धुळे जिल्ह्याचा संघ नुकताच रवाना झाला. या खेळाडूंना संस्थेचे क्रीडा प्रमुख व क्रिकेट प्रशिक्षक प्रा.राकेश बोरसे यांचे मार्गदर्शन लाभले.



## देशातील नागरिकांना अन्न पुरवण्याचे काम शेतकरी करतो

### उपसरपंच राहुल रंधे यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय शेतकरी दिवसानिमित्त पार पडला बळीराजा सन्मान सोहळा

प्रतिनिधी । बोराडी

**शेतकरी राजा हा देशाचा पोशिंदा आहे. आपल्याला नव्हे तर देशातील नागरिकांना अन्नपुरवण्याचे काम शेतकरीराजा करीत आहे. शेतकरी राजावर अनेक वेळा नैसर्गिक संकट आली. तरी देखील त्याला तोंड देण्याची क्षमता फक्त शेतकरी राजामध्येच असू शकते, असे प्रतिपादन पंतप्रधान आत्मनिर्भर अभियान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा उपसरपंच राहुल रंधे यांनी केले.**

बोराडी ग्रामपंचायतवतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राष्ट्रीय शेतकरी दिवसानिमित्त बळीराजा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी शेतकरी मधुकर पाटील, दत्तू पाटील, न्हानू भिल, मांगा पावरा, प्रताप पाटील, नारायण पावरा, ठाणसिंग भिल, रामदास गुजर, महिंद्रा निकम, शालिक पाटील, भटू पाटील, संदीप गुजर, पुरुषोत्तम पवार, नाना पावरा, दिलीप पावरा, सदस्य विद्या रंधे, उर्मिला पावरा, नीता पवारा, सोनाली सत्तेसा, चांदारीबाई पावरा, आरती भिल, अनिता बडगुजर, मयुरी पवार, शारदा भिल, अनिल पावरा, चंद्रसिंग पवार, बबन पाटील, हारसिंग पावरा, भीमसिंग कुवर, निलेश महाजन, सतीश पवार आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री. रंधे यांनी, बोराडी ग्रामपंचायतच्या माध्यमातून आधुनिक शेती कशी करावी, बदलत्या हवामानाशी जुळवून घेत शेतीत शाश्वतता कशी साधावी, कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरावे, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, सूक्ष्म सिंचन पद्धती, सेंद्रिय शेती, मृदा परीक्षण, पीक व्यवस्थापन आणि बाजारपेठेतील व्यवस्था याबाबत आपण वेळोवेळी कार्यशाळा घेऊन त्यांना मार्गदर्शन करणार आहे.

### अभिमानास्पद कार्यक्रम : साळुंखे

शेतकऱ्यांच्या कष्टाला, त्यांच्या योगदानाला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेतील त्यांच्या भूमिकेला मान देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम गावासाठी अभिमानास्पद ठरणार असल्याचे मत ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र साळुंखे यांनी सांगितले.

## सचिन पाटील यांची राज्यस्तरीय संगीत वाद्य वादन स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । तळोदा

**महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या नाशिक विभागीय संगीत वाद्य वादन स्पर्धेत श्रीमोती प्राथमिक विद्यामंदिर येथील शिक्षक सचिन नारायण पाटील यांची चमकदार कामगिरी केली. त्यामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध विभागातून स्पर्धक सहभागी होणार आहेत. शिक्षकांमध्ये असलेले सुप्त गुण हे विकसित व्हावेत, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्यापनात करता यावा, हा हेतू महाराष्ट्र शासनाने डोळ्यासमोर ठेवून अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करीत



असते. दरम्यान, संगीत वाद्य वादन स्पर्धा नुकतीच घेण्यात आली. यात सचिन पाटील यांनी केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

### दर्पणरत्न पुरस्कार जाहीर

सचिन पाटील यांना हिंदी, मराठी पत्रकार संघातर्फे २०२६ या वर्षाचा 'दर्पणरत्न पुरस्कार' हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पाटील यांच्या या यशाबद्दल महावीर ज्ञानप्रसारक मंडळाचे संस्थाध्यक्ष निखिल तुरखिया, संचालिका सोनाभाभी तुरखिया, समन्वयक हर्षिल तुरखिया, उपाध्यक्ष डी.एम. महाले, सचिव संजय पटेल यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तालुका गट शिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख आदींनी अभिनंदन केले आहे.

## आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर नवनवीन गोष्टी शिकत स्वत:ला अद्ययावत ठेवणे आवश्यक



### पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचा सल्ला; पदवीधर पोलीस तपासी अंमलदाराचे प्रशिक्षण संपन्न

प्रतिनिधी । धुळे

**सायबर गुन्हेगारी व पुरावा संकलनाच्या प्रक्रियेत ई-साक्ष ॲपसह अनेक आधुनिक बदल झाले आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर नवनवीन गोष्टी शिकत स्वत:ला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे, असा सल्ला पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सल्ला दिला.**

धुळे पोलीस प्रशिक्षण केंद्रात दि.८ ते ३० डिसेंबर या कालावधीत ३ आठवड्याचे पदवीधर पोलीस तपासी अंमलदाराचे प्रशिक्षण सत्र क्र.२ चे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण सत्रात सहभागी झालेल्या पोलीस अंमलदारांना निरोप देण्यासाठी सोमवार, दि.२९ रोजी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

प्रास्ताविकात बोलतांना प्रभारी प्राचार्य राहुल फुला यांनी, प्रशिक्षणादरम्यान मारामारी, रस्ता अपघात, घरफोडी, जुगार व अकस्मात मृत्यू यांचे देखावे उभारून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. तसेच एफएसएल मोबाईल व्हॅनद्वारे रक्त संकलन किट, फॅराडे बॅग व आधुनिक साहित्यांची ओळख करून देण्यात आली. ई-साक्ष ॲप हाताळणीचे ज्ञानही देण्यात आले असून याचा प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना मोठा लाभ होणार असल्याचे सांगितले.

शिक्षण गुन्हे अन्वेषण विद्यालय, नाशिक यांच्या अधिपत्याखाली हे प्रशिक्षण राबविण्यात आले. या प्रशिक्षणास नाशिक शहर, छत्रपती संभाजी नगर, नाशिक ग्रामीण, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, लोकमार्ग छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, हिंगोली जिल्ह्यातील २९१ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. त्यांना प्राचार्य चंद्रकांत खांडवी, प्रभारी उप प्राचार्य तथा पोलीस निरीक्षक राहुल फुला यांच्यासह प्रशिक्षण केंद्रातील १३, आंतरवर्ग अधिकारी तथा प्रशिक्षक पोलीस निरीक्षक, ५ विधी अधिकारी, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयाकडून प्रशिक्षण प्राप्त केलेले ३ घटकातील प्रत्येकी १ अधिकारी असे एकूण २१ पोलीस अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणानंतर घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत २८८ प्रशिक्षणार्थी उत्तीर्ण झाले तर ३ प्रशिक्षणार्थी अनुत्तीर्ण झाले. त्यांना उत्तीर्ण होण्यासाठी पुढे दोन संधी देण्यात येणार आहे. यावेळी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या पदवीधर पोलीस तपासी अंमलदारांचा पोलीस अधीक्षक धिवरे यांच्याहस्ते ट्रॉफी, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## आर.सी. पटेल अभियांत्रिकीच्या १८ प्राध्यापकांना पीएच.डी. प्रदान

प्रतिनिधी । शिरपूर

**शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांतील १८ प्राध्यापकांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पार पडलेल्या ३४ व्या दीक्षांत समारंभात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने प्राध्यापकांनी उच्च शैक्षणिक टप्पा गाठल्याने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

बंगलोर येथील राष्ट्रीय मुल्यांकन परिषदेचे संचालक प्रा.गणेशन कन्नबीरन यांच्याहस्ते त्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. पीएच.डी. प्राप्त केलेल्या प्राध्यापकांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड



टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.अनुपकुमार जयस्वाल, डॉ.प्रशांत गोड, डॉ.किरण सोनवणे, डॉ.नरेंद्र लोखंडे, डॉ.भूषण पाटील, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.प्रमोद पाटील, डॉ.योगेश सोनवणे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.भूषण पाटील, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.प्रविण सरोदे, डॉ.किरण चौधरी, डॉ.भूषण पाटील, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाचे डॉ.संदिप सोनवणे, डॉ.मनीषा पाटील, डॉ.मकरंद माळी, डॉ.पुजा सराफ, डॉ.शितल पाटील, डॉ.मुहम्मद सय्यद, अप्लाईड सायन्सेस अँड ह्युमॅनीटीज विभागाचे डॉ.विजय सूर्यवंशी यांचा समावेश आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी आ. अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल आदींनी अभिनंदन केले आहे.

### ही अभिमानाची गोष्ट

एकाच वेळी १८ प्राध्यापकांना पीएच.डी. पदवी देऊन गौरव करणे, ही आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकीच्या संशोधन संस्कृतीसाठी अभिमानाची गोष्ट आहे. हे यश जागतिक दर्जाच्या शिक्षणाप्रती असलेली आमची वचनबद्धता देखील सिद्ध करते. या डॉक्टरेट पदव्यांमुळे केवळ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावणार नाही, तर विद्यार्थ्यांच्या संशोधक वृत्तीलाही नवी चालना मिळेल. या सर्व प्राध्यापकांचे हे योगदान समाज आणि तंत्रज्ञान क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरेल.

**- डॉ.जे.बी. पाटील,**
संचालक, आर.सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय

# महापालिका निवडणुकीत प्रस्थापितांना डच्चू

## महायुतीच्या यादीने उडवला राजकीय गोंधळ; निष्ठावंतांची नाराजी : नेत्यांकडून मनधरणीचे प्रयत्न







प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महापालिका निवडणुकीसाठी महायुतीच्या उमेदवारांची यादी जाहीर होताच शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. भाजप तसेच शिवसेना (शिंदे गट) यांनी अनेक दिग्गज व प्रस्थापित उमेदवारांना तिकीट नाकारल्याने पक्षांतर्गत कलह निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणारे पदाधिकारी आणि माजी नगरसेवकांनाच डावलल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष दिसून येत आहे. त्यामुळे नाराजी नाट्य देखील रंगले.**



मनपा निवडणुकीसाठी एकूण १ हजार ३८ उमेदवारी दाखल झाले आहे. त्यात उमेदवारी नाकारलेल्या प्रस्थापित उमेदवारांमध्ये आबा कापसे, प्रा.डॉ.सचिन पाटील, भाजपविरोधात विधानसभा निवडणूक लढवणारे बंडखोर मयूर कापसे, अश्विन सोनवणे यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांचा समावेश आहे. या नेत्यांना अचानक डच्चू दिल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तिकीट नाकारल्याची माहिती मिळताच काही इच्छुक उमेदवार व त्यांच्या कुटुंबीयांना महापालिका दालनात भावनांना आवर घालता न आल्याचे चित्र पाहायला मिळाले. काही ठिकाणी अश्रू, संताप आणि निषेधाच्या प्रतिक्रिया उमटल्या. महायुतीकडून नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा दावा केला जात असला तरी प्रस्थापितांना बाजूला सारल्याने पक्षाची संघटनात्मक ताकद कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अनेकांनी या निर्णयामागे अंतर्गत राजकारण व गटबाजी असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, आमदार राजूमामा भोळे यांनी नाराज उमेदवारांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, नाराज उमेदवार थेट वरिष्ठ पातळीवर जाऊन तिकीट मिळवण्यासाठी प्रयत्न केल्याचे चित्र होते. प्रस्थापितांना डच्चू दिल्याने महायुतीसमोर बंडखोरीचा धोका वाढला असून, येत्या काही दिवसांत शहरातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची चिन्हे आहेत.

### ➤ कारागृहातून ललित कोल्हेंची उमेदवारी



**जळगाव महापालिका निवडणुकीत यंदा एक अभूतपूर्व आणि चर्चेचा विषय ठरलेली घटना घडली आहे. शहराच्या इतिहासात प्रथमच कारागृहातून नगरसेवकपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. बोगस कॉल सेंटर प्रकरणातील प्रमुख आरोपी ललित विजयराव कोल्हे यांनी नाशिक येथील कारागृहात असतानाच महापालिकेच्या नगरसेवकपदासाठी उमेदवारी अर्ज सादर केला आहे. या घटनेमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. नागरिकांमध्ये आश्चर्य आणि कुतूहल व्यक्त केले जात आहे. ललित कोल्हे हे बोगस कॉल सेंटर प्रकरणात अटकेत असून सदर प्रकरणात त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या कोल्हेंना नाशिक कारागृहात ठेवण्यात आले आहे. अशा परिस्थितीतही त्यांनी कायदेशीर प्रक्रियेअंतर्गत आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणूक प्रक्रियेबाबत नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत. निवडणूक कायद्यानुसार आरोपी किंवा कारागृहात असलेली व्यक्ती काही अटींच्या अधीन राहून निवडणूक लढवू शकते, मात्र जळगाव महापालिकेच्या इतिहासात अशी घटना यापूर्वी कधीच घडलेली नाही. त्यामुळे ही उमेदवारी केवळ राजकीय नव्हे तर कायदेशीर आणि नैतिक चर्चेचा विषय ठरत आहे.**

### महायुतीचे उमेदवार...

प्रभाग १ अ– भाजपा रिटा विनोद सपकाळे, १ ब – शिवसेना दिलीप बबनराव पोकळे, १ क – शिवसेना संगीता दांडेकर, १ ड – शिवसेना फरदीन फिरोज पठाण, २ अ – शिवसेना सागर श्याम सोनवणे, २ ब – शिवसेना उज्ज्वला किशोर बाविस्कर, २ क – भाजपा पूजा विजय जगताप, २ ड – भाजपा विजय लक्ष्मण बांदल, ३ अ – भाजपा अर्चना संजय पाटील, ३ ब – भाजपा प्रतिक्षा कैलास सोनवणे, ३ क – शिवसेना कोल्हे प्रवीण रामदास, अत्तरदे दिनेश, ३ ड – भाजपा निलेश तायडे, ४ अ – भाजपा शशीबाई (शशिकला) शिवचरण ढंढोरे, ४ ब – भाजपा विद्या मुकुंदा सोनवणे, ४ क – भाजपा कल्पेश कैलास सोनवणे, ४ ड – शिवसेना कोल्हे पियुष ललित, ५ अ – शिवसेना भंगाळे विष्णू रामदास, ५ ब – शिवसेना चौधरी मंगला संजय, ५ क – भाजपा आशा रमेश पाटील, ५ ड – भाजपा नितीन बालमुकुंद लढ्ढा, ६ अ – भाजपा जयश्री अशोक धांडे, ६ ब – ॲड. सुचिता अतुलसिंग हाडा, ६ क – भाजपा अमित पांडूरंग काळे , ६ ड – भाजपा दीपक प्रभाकर सुर्यवंशी, ७ अ – भाजपा दीपमाला मनोज काळे, ७ क – भाजपा विशाल सुरेश भोळे, ७ ड – भाजपा डॉ. राधेश्याम चौधरी, पंकज पाटील, शेखर अत्तरदे, ८ अ – भाजपा कविता सागर पाटील, ८ ब – भाजपा मानसी निलेश भोईटे, ८ क – भाजपा जैन भागचंद मोतीलाल, ८ ड – शिवसेना पाटील नरेंद्र आत्माराम, ९ अ – शिवसेना मनोज सुरेश चौधरी, ९ ब – शिवसेना प्रतिभा गजानन देशमुख, ९ क– भाजपा जयश्री राहूल पाटील, ९ ड – भाजपा डॉ. चंद्रशेखर पाटील, १० अ – भाजपा सुरेश माणिक सोनवणे, १० ब– भाजपा माधुरी अतुल बारी, १० क– भाजपा कविता किरण भोई, १० ड – भाजपा जाकीर पठाण, ११ अ– शिवसेना अमृता चंद्रकांत सोनवणे, ११ ब– शिवसेना संतोष मोतिराम पाटील, ११ क– शिवसेना सिंधु विजयराव कोल्हे, १२ अ – भाजपा अनिल अडकमोल, १२ ब –भाजपा उज्ज्वला बेंडाळे, १२ क– भाजपा गायत्री इंद्रजीत राणे, १२ ड – भाजपा नितीन बर्डे, १३ अ – भाजपा नितीन सपके, १३ ब– भाजपा सुरेखा नितीन तायडे, १३ क– भाजपा वैशाली अमित पाटील, १३ ड – राष्ट्रवादी प्रफुल्ल गुलाबराव देवकर, १४ अ– भाजपा सुनिल सुपडू महाजन, १४ ब– भाजपा जयश्री सुनिल महाजन, १४ क– भाजपा रबीयाबी अमजद खान, १४ ड – भाजपा ऋतिक संजय ढेकळे, १५ अ – भाजपा अरविंद देशमुख, १५ ब – भाजपा सौ. चेतन शिरसाळे, १५ क– शिवसेना रेशमा कुंदन काळे, १५ ड – भाजपा प्रकाश रावलमल बालानी, १६ अ– भाजपा डॉ.विश्वनाथ सुरेश खडके, १६ ब– भाजपा सौ. संतोष इंगळे, १६ क – भाजपा रंजना विजय वानखेडे, १६ ड – भाजपा सुनिल वामनराव खडके, १७ ड – राष्ट्रवादी प्रशांत सुरेश नाईक, १८ अ– शिवसेना गौरव चंद्रकांत सोनवणे, १८ ब– शिवसेना नलुबाई तुळशिराम सोनवणे, १८ क– शिवसेना अनिता सुरेश भापसे, १९ अ – शिवसेना रेखा चुडामण पाटील, १९ ब –शिवसेना विक्रम किसन सोनवणे, १९ क– शिवसेना निकिता अनिल देशमुख, १९ ड – भाजपा राजेंद्र झिपरू पाटील.







### ➤ विकासाच्या मुद्यावर लोकांसमोर जाणार

भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यात महापालिकेसाठी युती झालेली आहे. शहराच्या विकासाच्या मुद्यावर लोकांसमोर जाणार असल्याची माहिती आ.राजूमामा भोळे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करतांना दिली. भाजपाला ४६, शिंदेसेना २३, राष्ट्रवादी ०६ असे एकूण ७५ जागा वाटप करण्यात आल्या आहेत. महायुती झाल्याने निष्ठावंत कार्यकर्ते नाराज झाले असून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच नाराज कार्यकर्त्यांना चांगली संधी देण्याचाही प्रयत्न राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जनतेमध्ये जावून काम करणाऱ्यांना संधी दिली आहे.

# चोपड्याचे शिक्षक पंकज शिंदेंची राज्यस्तरावर निवड

प्रतिनिधी । चोपडा

## • प्रताप विद्या मंदिराची यशोपताका कायम

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यासाठी आयोजित विभागस्तरीय वादविवाद स्पर्धेत प्रताप विद्यामंदिर चोपडा येथील उपशिक्षक पंकज शिंदे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तत्पूर्वी तालुकास्तरावरील वादविवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी नंदुरबार येथे आयोजित वादविवाद स्पर्धेत तालुक्याचे प्रतिनिधित्व केले होते. जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार जिल्ह्यांच्या सर्व तालुक्यातील विजेत्या स्पर्धकांसाठी आयोजित विभागस्तरीय स्पर्धेत त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणे योग्य की अयोग्य? या विषयावर युक्तिवाद करत हे यश मिळवले. या यशामुळे आता पंकज शिंदे यांची वाशिम येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेसाठी निवड झाली



आहे. या यशाबद्दल चोपडा एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा शैलाबेन मयूर, उपाध्यक्ष विश्वनाथ अग्रवाल, चेअरमन राजाभाई मयूर, सचिव माधुरीताई मयूर, कार्यकारिणी सदस्य उर्मिलाबेन गुजराथी, चंद्रहास गुजराथी, भूपेंद्रभाई गुजराथी, रमेश जैन तसेच शाळेचे मुख्याध्यापक पी.एस. गुजराथी, उपमुख्याध्यापिका एम.डब्ल्यू.पाटील, उपप्राचार्य जे.एस.शेलार, पर्यवेक्षक ए.एन.भट, एस.व्ही. करमरकर, पी.ए.नागपुरे, समन्वयक गोविंदभाई गुजराथी, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (सीपीडी) साधण्याच्या उद्देशाने या स्पर्धांचे राज्यभर आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी राज्यस्तरीय मंच यावेळी परिषदेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. यशस्वी गुणवंत शिक्षकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.

# तायक्कांदो स्पर्धेत दीक्षा कांबळेला कांस्यपद

प्रतिनिधी । बोदवड

दि. २६ ते २८ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्कांदो स्पर्धा सिंधुदुर्ग येथे पार पडली. यामध्ये जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत बोदवड येथील पँथर तायक्कांदो अकॅडमी मधील २२ किलो वजनी गटांमध्ये दीक्षा सिद्धार्थ कांबळे हिने कांस्यपदक प्राप्त केले. तिच्या यशामागे जळगाव जिल्ह्याचे सचिव अजित घारगे तसेच पँथर तायक्कांदो अकॅडमी सचिव निकेतन भिमराव खोडके यांचे मार्गदर्शन लाभले.

# धरणगावात २३ वर्षांनंतर मित्र जमले एकत्र माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव



येथील कला व वाणिज्य महाविद्यालय, सन २००३ बी.ए. बॅचचा स्मृतिगंध माजी विद्यार्थी मेळावा रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात पार पडला. तब्बल २३ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कविता सादरीकरण व गायनामुळे कार्यक्रमात रंगत आली. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक प्रा. शेख सर उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाल, श्रीफळ व मिठाई देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या मेळाव्याला २८ माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन मंदार चौधरी, गजानन साठे, गणेश चौधरी, शामकांत पाटील व सुवर्णा पाटील यांनी केले. माजी विद्यार्थी दिनेश पाटील यांनी स्वीट वस्तूंचे वाटप के ले.

# चोपडा महाविद्यालयात रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबीर

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय, चोपडा येथील विद्यार्थी विकास विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी यांच्या रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. डॉ. आर. एम. बागुल, रक्तगट व हिमोग्लोबिन




तपासणीस व कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शासकीय रुग्णालयातील तंत्रज्ञ चंद्रशेखर साळुंखे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी व रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी वैभव कांगणे, युवतीसभा प्रमुख व सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रिती रावतोळे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर. आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. प्रिती रावतोळे यांनी केले. यावेळी त्यांनी आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान कार्यक्रमांद्वारे महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेतली जाते म्हणून आज रक्तगट आणि हिमोग्लोबिन तपासणी केली जाणार आहे, त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थिनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. सूत्रसंचलन व आभार सुनिता बी. पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.डी.डी.कर्दपवार, डॉ. आर देवरे, धनंजय चौधरी, जितेंद्र कोळी, निलेश भाट, विशाल पाटील यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी अनिता लांडगे, शिरीन सय्यद, राजश्री निकम, विशाखा देसले, अश्विनी सूर्यवंशी व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होते.

**➤ यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्रा. डॉ. के. एन.सोनवणे यांनी प्रथमत: महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान या कार्यक्रमाचे संयोजकत्व महाविद्यालयास दिल्याबद्दल विद्यापीठाचे आभार व्यक्त केले. यावेळी त्यांनी आरोग्य तपासणीमुळे विद्यार्थिनींच्या आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण होईल व लोहाची कमतरता किंवा इतर आरोग्य समस्या समजतील तसेच त्यावर तत्काळ उपचार घेता येतील, ज्यामुळे भविष्यामध्ये आरोग्याशी संबंधित समस्या टाळता येतील. विद्यार्थिनीच्या मानसिक व आहारविषयक आरोग्यासाठी असे कार्यक्रम अतिशय उपयुक्त आहेत असे विवेचन केले.**

# शैक्षणिक व्यासपीठ सभेसाठी उपस्थितीचे शिक्षणाधिकाऱ्यांकडून पत्र

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील न्हावी येथे जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या माध्यमातून शिक्षणाधिकाऱ्यांच्या शिक्षण विभागाच्या अडवणुकीच्या कारभाराविरुद्ध साखळी उपोषण आयोजित केले होते. त्यावेळी शिक्षणाधिकारी यांना मागितलेली माहिती चार दिवसात देण्यात येईल व सात दिवसांत समीटिंग लावण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मात्र त्यांनी तसे न केल्यामुळे साखळी उपोषण थांबविले होते. त्या अनुषंगाने नुकतेच माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडून शैक्षणिक व्यासपीठास दि.३० डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत बैठकीचे आमंत्रण देण्यात आले आहे.

# खिरोद्यात काँग्रेसचा १४० वा स्थापना दिन साजरा

प्रतिनिधी । रावेर

**तालुक्यातील खिरोदा येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या १४० व्या स्थापना दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून काँग्रेसच्या वैचारिक परंपरेला उजाळा देत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.**

जिल्ह्यातील विविध गावांतून काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक विकासात काँग्रेसने दिलेल्या ऐतिहासिक योगदानाचा आढावा घेतला. यावेळी काँग्रेस मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी आ.शिरीष चौधरी, माजी आ. रमेश चौधरी, जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार माजी जिल्हाध्यक्ष संदीपभैय्या पाटील, मुक्ती हारून नदवी, धनंजय चौधरी, अतुल पाटील, ऐश्वर्य राठोड, छाया पाटील, राजू सूर्यवंशी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये काँग्रेसच्या वतीने निवडणूक लढवलेल्या सर्व उमेदवारांचा यावेळी सन्मान करण्यात आला. जनतेसाठी प्रामाणिकपणे लढणे हाच खरा विजय आहे, असे मत नेत्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी पक्षासाठी आयुष्य वाहिलेल्या दिवंगत कार्यकर्त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.**